## -: प्रेसनोट दिनांक - १८/०२/२०१९ :-

**आरोपी जयवंत आबाजी तोडकर, वय ४१, खाजगी उमेदवार, रा. हनुमान गल्ली, बालिंगा, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांचे मुलीचे पती माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये मयत झाले असुन तिचे सास-यांचे नावे असले रेशनकार्डमध्ये तिचे स्वत:चे, सासरे, सासु व दोन मुलांची नावे एकत्रित आहेत. परंतु तक्रारदार यांचे मुलीला तिचे व तिच्या मुलांचे विभक्तपणे रेशनकार्ड काढायचे होते. तक्रारदार यांची मुलगी विधवा असलेने तिच्या तर्फे तक्रारदार यांनी केर्ले येथील सेतु केंद्रामध्ये रेशनकार्ड विभक्त होण्यासाठी रितसर नोंद/अर्ज करून त्याबाबतची कागदपत्रे आपलेकडे घेतली. तक्रारदारांनी ती कागदपत्रे पुढील कारवाईकरीता करवीर तहसीलदार कार्यालयातील पुरवठा विभागामध्ये दिली. तेव्हा तेथील खाजगी उमेदवार जयवंत तोडकर यांनी तक्रारदार यांना तुमच्या मुलीचे विभक्त रेशनकार्ड काढुन पाहिजे असेल तर तुम्ही मला २५००/- रू. द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांना तोडकर हे क्लार्क असलेचा समज झालेने त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १४/०२/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे जयवंत तोडकर यांचेविरुध्द तक्रारी अर्ज दिलेला आहे.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक १४/०२/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये खाजगी उमेदवार जयवंत तोडकर यांनी तक्रारदार यांचेकडे त्याचे मुलीचे विभक्त रेशनकार्ड करून देण्याकरीता रुपये २,५००/- रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक १८/०२/२०१९ रोजी खाजगी उमेदवार जयवंत तोडकर यांचेविरुध्द करवीर तहसीलदार कार्यालयातील पुरवठा विभाग कार्यालयामध्ये सापळयाचे आयोजन केले असता खाजगी उमेदवार जयवंत तोडकर यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारांसमक्ष तडजोडीअंती २,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. संदिप दिवाण पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. मारूती पाटील, पोलीस निरीक्षक, सहाय्यक फौजदार मनोहर खनंगावकर, पोलीस नाईक शरद पोरे, नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल मयुर देसाई व चालक विष्णु गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**
**३) श्री.गिरीष गोडे , पो.उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर ८१०८६६०७०७ ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक :- १०६४.**
**५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३**